**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. रघुनाथ भगवान इंजे, रा. मु.पो.निढळ, ता. खटाव, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २९१ / सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत निढळ, ता. खटाव, जि.सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव, ता. खटाव, जि. सातारा | मौजे निढळ येथील भूमापन क्र.५८० या मिळकती संदर्भात दि. १८.३.१९८३ रोजी विशेष जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, यांनी कोणत्या माहितीची पूर्तता केली, याची माहिती व तद्अनुषंगिक इतर माहिती | भूमापन क्र.५८० मिळकतीबद्दल महसूल अधिनियम १९६६ कलम २०(२) अन्वये व कलम २२७, २२८ अन्वये समन्स प्रती धारकास पाठविल्या आहेत. त्यावर काय पूर्तता केली याची माहिती अपीलकर्त्याने मागितली होती. अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती ग्रामपंचायती मध्ये उपलब्ध नसल्याबाबतचे उत्तर अपीलकर्त्यास मुदतीत दिले असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. दिलेल्या समन्सच्या संदर्भात ग्रामपंचायतीने कोणत्या माहितीची पूर्तता केली, ही 'माहिती' ची मागणी संदिग्ध स्वरूपाची आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १८ .१०.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. निवृत्ती विष्णू साळूंखे, रा. जिल्हा परिषद कॉलनी, आगाशिवनगर, कराड, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २९६ / सातारा | तालुका कृषि अधिकारी, पाटण, ता.पाटण, जि.सातारा | जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सातारा | पश्चिम घाट विकास, काळगांवमध्ये भात खाचर योजनेचे दि. ३१ मार्च २००५ नंतर किती प्लॅनिंग (मंजूर), शिल्लक याबाबतची, तसेच एकूण नऊ मुद्दयां-बाबतची माहिती | तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रथम अपील चुकीच्या अधिकाऱ्याकडे केले होते, हे अपीलकर्त्याने मान्य केले. त्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी, कराड यांच्याकडे सुनावणी होऊन कार्यवाही करण्याचे ठरले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.१०.२००८**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. गणेश हणमंत जाधव रा. बदेवाडी, पो.भुईंज, ता.वाई, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३०४ / सातारा | ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत खेड, ता.जि.सातारा | गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, सातारा | ग्रामपंचायत खेड, ता. जि. सातारा येथील मिळकत क्र.१७८, घराच्या नोंदी फॉर्म क्र.८ (उतारा) मिळणे बाबत यासह एकूण ९ मुद्दयां-बाबतची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. सादर केलेल्या कागदपत्रांवरून ते सिध्द होते. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १४.१०.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०४ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रकाश सखाराम खडतरे<br>विश्वकरण पार्क, ब्लॉक नं.२४, पाण्याच्या टाकीजवळ, जुळे सोलापूर, जि.सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे<br>अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे कार्यालय, ठाणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे | हजर |

अपीलकर्ता श्री. प्रकाश सखाराम खडतरे यांनी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे अधिनस्त प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षक पदावर एकाच ठिकाणी सहा वर्षापेक्षा जास्त व २० वर्षांपेक्षा कमी कालावधीत कार्यरत असलेल्यांची जाती व लिंग निहाय यादी उच्च न्यायालय, मुंबई रिट याचिका क्र. ८३८३/२००३ चे संदर्भात दि. ६.५.२००४ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने माहिती तसेच श्रीमती क.र.माने यांनी दि. १६.८.२००४, दि. २.११.२००४, दि. १७.१२.२००४ इ. अर्जान्वये मागणी केलेल्या बाबींवर कारवाई न करण्याची कारणे इ. मुद्दयांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्याकडे मागितली होती.

अपीलकर्ते श्री. खडतरे मयत झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. तसेच सोलापूर महानगरपालिका, आरोग्य विभाग, यांनी दि. २२.३.२००७ रोजी दिलेले श्री. खडतरे यांचे मृत्यू प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७ .९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | ३०६ + ३०७ +३०८ +३०९ + ३१० + ३११ + ३१२ + ३१३ + ३१४ + ३१५ +३१६ + ३१७ + ३१८ +३१९+३२०+३२१+३२२ / सोलापूर |
|---|---|---|
| १ | अपीलकर्ता | श्री. ज्ञानोबा रामकृष्ण काळे, मु.पो.कवठे, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकारी | मुख्याध्यापिका, अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, आदर्शनगर, कुमठा नाका, सोलापूर |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर |

| अपील क्रमांक | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|
| ३०६ / सोलापूर | १. दि. ८.२.२००० च्या मुख्याध्यापक मान्यता प्रस्ताव पत्रातील अहिल्याबाई प्रशालेसाठी श्री उषःकाल दलित शिक्षण प्रसारक मंडळ यांचेकडून प्राप्त झालेल्या ५ कागदपत्रांच्या प्रती<br>२. शाळेच्या मुख्याध्यापक नियुक्ती संदर्भात न्यायप्रविष्ट प्रकरणांची माहिती |
| ३०७/ सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सोलापूर यांनी अहिल्याबाई प्रशाला या माध्यमिक शाळेस १९९५.९६ मध्ये दिलेल्या शिक्षक मान्यता, प्रभारी मुख्याध्यापक मान्यता व मुख्याध्यापक मान्यता पत्रे |
| ३०८/ सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या दि. १७.१०.१९९४ च्या पत्रान्वये शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती शिवशरण यांना प्राप्त झालेल्या कागदपत्राच्या प्रती तसेच मुख्याध्यापक नियुक्तीस हरकतीचे निवेदन |
| ३०९ / सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी अहिल्याबाई प्रशाला यांना दिलेल्या सेवक संच मान्यतेच्या प्रती |
| ३१० / सोलापूर | १. शिक्षण विस्तार अधिकारी श्री. इंगळगी यांनी अहिल्याबाई प्रशालेस दि. १२.७.१९९४ रोजी भेट देऊन प्राप्त केलेल्या कागदपत्रांच्या प्रती<br>२. अहिल्याबाई प्रशालेकडून दि. ६.६.१९९६ रोजी शिक्षक मान्यता प्राप्त प्रस्तावामधील कागदपत्रे |
| ३११ / सोलापूर | अहिल्याबाई प्रशाला, सोलापूर मधील शिक्षक श्री. बी. बी. शेख यांना शिक्षक मान्यता दिलेल्या पाच पत्रांच्या प्रती |
| ३१२ / सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षिका श्रीमती बी.ए.शेख यांचे मूळ नियुक्ती आदेश, रूजू रिपोर्ट, संस्था ठराव प्रती |

| | |
|---|---|
| ३१३ / सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षिका श्रीमती बी.ए.शेख यांचे दि. २२.४.१९९६ रोजी शि. मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावातील नियुक्त. आदेश, संस्था ठराव, रूजू रिपोर्ट व मान्यता प्रत |
| ३१४/ सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षिका श्रीमती बी. ए. शेख यांनी शाळा न्यायाधिकरण सोलापूर मध्ये अपील क्र.१४/९५ च्या तडजोडीच्या प्रस्तावात नमूद केलेल्या दिनांक, वर्ष यासंबंधी न्यायालयास सादर केलेल्या पुराव्याची प्रत |
| ३१५/ सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील सन १९९१ ते डिसेंबर १९९७ अखेर मुख्याध्यापक पदावर कार्य केलेल्या मुख्याध्यापकाचा तपशील |
| ३१६ / सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षिका श्रीमती बी. ए. शेख यांनी शिक्षक पदावर कोणकोणत्या मुख्याध्यापकांच्या अधिकारामध्ये कोणत्या पदावर कार्य करीत होत्या, तसेच त्यांच्या सहशिक्षक पदाच्या कालावधीचा तपशील |
| ३१७ / सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षक श्री. डी.आर. काळे यांच्या सन १९९७ पासूनच्या पगारातून कोणकोणत्या विमा पॉलिसी रकमा कपात केल्या त्याचा तपशील |
| ३१८/ सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षक श्री. डी.आर. काळे यांच्या सन १९९७ ते २००६ च्या पगारातून प्रत्यक्ष आयकर व कपात केलेला आयकर याचा तपशील |
| ३१९/ सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षक श्री. बी. बी. शेख यांच्या शिक्षक मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे सन १९९७ ते २००६ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावातील कागदपत्रे |
| ३२० /सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षक श्री. डी.आर. काळे यांच्या माहे जून १९९७, जून १९९८, जून १९९९, जून २०००, जून २००१, जून २००२, जून २००३, जून २००४, जून २००५, जून २००६ पगार दाखल्याची प्रत |
| ३२१ / सोलापूर | १. अहिल्याबाई प्रशालेत शैक्षणिक वर्षानुसार मुख्याध्यापक पदावर नियुक्त केलेल्या श्री. डी. आर. काळे यांच्या १९९१-९२ ते १९९४-९५ या काळातील प्रभारी मुख्याध्यापक पदाचा नियुक्ती आदेश, संस्था ठराव, रूजू रिपोर्ट<br>२. १९९७-९८ मध्ये मुख्याध्यापक पदावरून कमी केल्यासंबंधी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण संचालक यांच्या मान्यतेच्या प्रती |
| ३२२ / सोलापूर | अहिल्याबाई प्रशालेतील शिक्षक श्री. बी. बी. शेख यांना शैक्षणिक वर्ष सन १९९७-९८ ते २००६ मध्ये मुख्याध्यापक पदावर नियुक्त केलेल्या नियुक्ती आदेशाची प्रत, संस्था ठराव, रूजू रिपोर्ट इ. प्रती |

अपीलकर्ता श्री. ज्ञानोबा रामकृष्ण काळे यांनी अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय या एकाच संस्थेकडील माहिती सातत्याने व विस्तृत स्वरूपात मागितली आहे. संस्था व श्री. काळे यांच्यातील वादाची पार्श्वभूमी त्याला आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. या संदर्भातील अर्जांचे व अपिलांचे त्यांचे प्रमाण पाहता त्रास देण्याच्या हेतूने ते अर्ज करीत असल्याच्या जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांनी दि. १२.११.२००७ रोजी सादर केलेल्या निवदेनाची गंभीर नोंद आयोग घेत आहे.

उभय बाजूंची वरील सर्व अपिलांमधील निवेदने, कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पत्रव्यवहार केला असल्याचे व माहिती देण्याबाबत प्रयत्न केल्याचे दिसून येते. मात्र वेळोवेळी रजिस्टर पोस्टाने पाठविलेली माहिती, पत्र, समक्ष देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने न स्वीकारल्याचे जन माहिती अधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. उपरोक्त वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महविद्यालय, सोलापूर यांनी यापूर्वी देऊ केलेली माहिती अपीलकर्त्यास तत्काळ व निःशुल्क द्यावी, व या संबंधित अनुपालन अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.९.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

३. माहितीच्या अधिकाराचा वापर कोणाला त्रास देण्यासाठी होता कामा नये, कायद्याच्या मूळ गाभ्यानुसारच झाला पाहिजे, याची जाणीव अपीलकर्ता श्री. ज्ञानोबा रामकृष्ण काळे यांना देण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १६.९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. गणपत धनवडे, मु.पो.नुने, ता. जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३१० / सातारा | निवासी नायब तहसीलदार, सातारा, जि. सातारा | तहसीलदार, सातारा, जि. सातारा | टेनन्सी / फेरचौकशी /२/२००७ च्या दि. ९.९.२००७ च्या निकालाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत | अपीलकर्ता गैरहजर. नकलेची प्रत घेऊन जाण्याबाबत विहित मुदतीत कळवूनही अपीलकर्त्याने माहिती नेली नाही. जन माहिती अधिकारी माहिती नि:शुल्क देण्यास तयार आहेत. परंतु अपीलकर्त्याने चलन भरू दिले नाही, हे कारण सांगून प्रत घेतलेली नाही व आयोगाकडे अपील केले आहे. अपीलकर्ता नकलेचे शुल्क न भरता तक्रार अर्ज करीत आहेत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.१०.२००८**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर दिनकर किर्वे
सर्व्हे क्र.२४, आंबेगाव पठार बु.,
श्री समर्थ स्वामी मठाजवळ, आंबेगाव, धनकवडी शिव, पुणे-४६ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी,
१८-स , सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४+३१४अ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधाकर दिनकर किर्वे
सर्व्हे क्र.२४, आंबेगाव पठार बु.,
श्री समर्थ स्वामी मठाजवळ, आंबेगाव, धनकवडी शिव, पुणे-४६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी,
१८-स , सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>निवडुंग सहकारी गृहनिर्माण संस्था, धायरी, पुणे-४२ या संस्थेच्या कामकाजाची व कर्तव्यांची संपूर्ण माहिती. संस्थेचे लेखापरीक्षक, वास्तुशास्त्रज्ञ यांची नांवे, पत्ता, संस्थेची पडताळणी सहकार खात्याने केव्हा केली, घेतलेले आक्षेप, संस्थेस दिलेला शेरा. संस्थेचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे काय, कर्जदार सभासदांचे वेळोवेळी कर्ज हप्ता मुक्त झालेल्या कर्जाची रक्कम, तपील तसेच मुक्त झालेला धनादेश बिल्डरला की संस्थेला दिला गेला इ.माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुधाकर किर्वे यांनी 'निवडुंग सहकारी गृहरचना संस्था' या संस्थेबाबतची कागदपत्रे, विकासकाचे अधिकार आदि माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, १८-स,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागितली होती. अनेक अर्ज व पत्रव्यवहार करुनही ही माहिती न मिळाल्यामुळे व प्रथम अपिलाचा निर्णय न मिळाल्यामुळे श्री. किर्वे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१७.३.२००८ रोजी पुणे येथे झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी त्या दिवशी उपस्थित राहू न शकल्यामुळे दि.२१.५.२००८ रोजी या अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

श्री. किर्वे यांनी मागितलेली माहिती ही संबंधित संस्थेची अंतर्गत बाब आहे. संस्थेच्या अंतर्गत कारभाराची माहिती हवी असल्यास संस्थेचे प्रवर्तक, सभासद किंवा पदाधिकारी यांच्याकडून घ्यावी, असे श्री.रविंद्र नार्वेकर, कार्यासन अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांनी श्री.किर्वे

ना दि.२४.१.२००६ रोजी कळविले होते. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मुंबई श्री.दिलीप बा.पाटील यांनी त्याचा आयोगापुढील सुनावणीत पुनरुच्चार केला. तसेच आपली कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे लेखी म्हणणे श्री.किर्वे यांनी संस्थेला दिले आहे, असेही त्यांनी सांगितले. मात्र त्या लेखी म्हणण्यावरील सही आपली नसल्याचे प्रतिपादन श्री.किर्वे यांनी केले.

सहकार विभागामार्फत गट विमा योजनेअंतर्गत निवडुंग सहकारी गृहनिर्माण संस्थेला कर्ज मिळालेले आहे. त्यामुळे या संस्थेची माहिती सहकार विभागाकडून मिळाली पाहिजे. प्रामुख्याने विकसक म्हणून नमूद असलेले श्री.पंकज घरत यांच्याबाबतची माहिती आपल्याला दिली जात नाही. ती दिली जावी, असे प्रतिपादन श्री.किर्वे यांनी केले. सरकारी कर्मचाऱ्याव्यतिरिक्त इतर सभासद गृहनिर्माण संस्थेत घेण्याबाबतची माहिती श्री. किर्वे यांना यापूर्वी देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.सी.बी.चौधरी यांनी स्पष्ट केले. 'श्री.किर्वे यांच्या अपिलासंदर्भात दि.२७.२.२००८ रोजी उपसचिव तथा अपिलीय अधिकारी यांच्या दालनात सुनावणी होऊन त्याना आवश्यक असलेली माहिती प्रत्यक्ष दाखविण्यातआलेली होती व त्यामुळे त्याचे समाधान झालेले आहे. तसेच त्या माहितीच्या छायाप्रती देखील त्यांना देण्याकरीता काढण्यात आल्या असता त्या त्यांनी न घेताच ते त्यादिवशी कार्यालयातून निघून गेले,' असे श्री.दि.बा.पाटील यांनी लेखी व तोंडी सांगितले.

संस्थेच्या दस्तऐवजाबाबत कोणतीही माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून आपल्याला मिळत नाही त्यामुळे आपल्याला व आपलया कुटुंबियांना मानसिक त्रास होत आहे, असे प्रतिपादन श्री. किर्वे यांनी विस्ताराने केले. विविध अधिकाऱ्यांकडे अर्ज व अन्य पत्रव्यवहार श्री. किर्वे यांनी व्यापक स्वरुपात केला आहे, हे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

निवडुंग सहकारी गृहरचना संस्थेच्या सचिवांनी संबंधित माहिती श्री. किर्वे यांना देणे आवश्यक असल्याचे व ती न दिली गेल्यास ते शास्तीस पात्र ठरतील याची जाणीव आयोगाने श्री.चौधरी व श्री.पाटील यांना दिली. सहकार खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना पाठवून गृहनिर्माण संस्थेच्या

सचिवांना शास्तीची स्पष्ट कल्पना देऊन माहिती श्री. किर्वे यांना देण्यास कळवावे व १५ दिवसात ही कार्यवाही पूर्ण करावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते.

देय माहितीचा त्या त्या मुद्दयांनुसार संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांनी देय माहिती १५ दिवसात द्यावी, असे आदेशही आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते.

श्री.दि.बा.पाटील यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४) व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना दि.२६ मे २००८ रोजी पत्रान्वये हे आदेश कळविले. त्यासोबत श्री. किर्वे यांच्या अर्जांच्या व अपिलांच्या छायांकित प्रती पाठविल्या. 'मंत्रालय स्तरावरील उपलब्ध असलेल्या एकूण ७५० पृष्ठांच्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती अर्जदारास देण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाशी संबंधित माहिती देण्याबाबतचा आता कोणताही मुद्दा आता प्रलंबित नाही,' असे श्री.पाटील यांनी या पत्रात नमूद केले असून कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगाला सादर करण्याबाबत कळविले. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे यांनी ऊर्वरित माहितीची पूर्तता करुन दि.२५.६.२००८ रोजी श्री.किर्वे यांना तपशील कळविला. 'दि.४.५.२००८ रोजी सचीव म्हणून नियुक्ती झालेले श्री.महेश यमजाल यांच्या सभासदत्वाबाबत व कर्जाबाबत चौकशी करण्यात येईल. संस्था नोंदणी दि.२७.६.२००२ पासून दि.२६.५.२००८ पर्यंत झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त वगैरे कागदपत्र गहाळ झाली असून श्री.यमजाल यांनी दि.२६.६.२००८ रोजी या संदर्भात अभिरुची पोलिस चौकी, सिंहगड रोड, पुणे येथे तक्रार नोंदविली आहे,' असे उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाचे जन माहिती अधिकारी श्री.एम.एस.जाधवर यांनी या पत्रात नमूद केले आहे. मात्र श्री.पंकज घरत यांच्या संदर्भातील व सभासदांबाबतची सर्व माहिती आपल्याला अद्यापही मिळालेली नाही, असे श्री. किर्वे यांनी दि.८.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे. संस्थेची सहा वर्षातील कागदपत्रे गहाळ झाल्यावर आयोगापुढील सुनावणीनंतर त्याबाबतची तक्रार पोलिसांकडे नोंदविण्यात आली आहे. जाणीवपूर्वक भ्रष्टाचार

ऱडपण्यासाठी कागदपत्रे गहाळ करण्यात आली आहेत, असा संशय श्री. किर्वे यांनी या पत्रात व्यक्त केला आहे.

वरील संदर्भ व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता श्री. किर्वे यांना माहिती देण्याबाबत निवडुंग सहकारी गृहरचना संस्था यांची भूमिका पारदर्शक दिसत नाही. कागदपत्रे गहाळ होण्याच्या संदर्भात शंका निरसन होणेही आवश्यक आहे.

यास्तव आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर(४) या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी श्री.एम.एस.जाधवर यानी दि.२५.६.२००८ रोजी श्री.किर्वे यांना पाठविलेल्या पत्रातील मुद्दा क्रमांक १ व मुद्दा क्रमांक २ व ३ याबाबतच्या कार्यवाहीची पूर्तता दि.२५.११.२००८पर्यंत करुन अचूक माहिती श्री.किर्वे यांना निःशुल्क द्यावी.

(३) कागदपत्र गहाळ झाल्याबाबतच्या चौकशीचा अहवाल अभिरुची पोलिस चौकी, सिंहगड रोड, पुणे यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन पोलीस अधीक्षक, (ग्रामीण), पुणे यांनी दि.२५.११.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(४) श्री.किर्वे यांनी दि.२२.२.२००६ रोजी प्रथम अपील केले. त्याची सुनावणी अपिलीय प्राधिकारी तथा उपसचीव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी दि.२७.२.२००८ रोजी म्हणजे दोन वर्षांनी घेतली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जास्तीत जास्त ४५ दिवसात अपिलाचा निर्णय देणे आवश्यक आहे, याची जाणीव व ही पूर्तता न केल्याबद्दल समज श्री.सी.बी.चौधरी, उपसचिव यांना देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २४.१०.२००८**
ऑक्टोबर-१२-१६

प्रतः:पोलीस अधीक्षक (ग्रामीण), पाषाण, पुणे यांना माहिती व कारवाईसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. मच्छिंद्र शंकर भोसले, मु.पो.सुर्ली, ता. कोरेगाव, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३२६ / सातारा | जन माहिती अधिकारी तथा फौजदार कोरेगाव, जि.सातारा | पोलीस उप अधीक्षक, ता. व जि. सातारा | शोभा एजन्सी, कोरेगांवचे प्रोप्रायटर श्री. जयवंत बाजीराव शिंदे यांनी पाईप खरेदी बिलातून व्याज म्हणून रूपये २०५८/- जबरदस्तीने घेतलेबद्दल गुन्हा नोंद होऊ शकतो काय, याची माहिती | गैरसमजुतीने अपील अर्ज केला असल्याचे व नवीन अर्ज देऊन अपेक्षित माहिती प्राप्त करून घेण्यास अपीलकर्त्याने तीनही घटकांमधील चर्चेत नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.१०.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. आनंदराव रामचंद्र पवार व श्री. दिपक लक्ष्मण सुपूगडे, मु. मराठवाडी, पो. ढेबेवाडी, ता.पाटण, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३३२/ सातारा | सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी सातारा | जिल्हा पुरवठा अधिकारी सातारा जि. सातारा | सन १९९९ ते एप्रिल २००६ या कालावधी तील ग्राहक संख्या २८४ असणारे यादी प्रमाणे करावयाच्या चौकशी बाबतची सद्यस्थिती व चौकशी होणार नसल्यास त्याप्रमाणे लेखी कळविणे बाबतच्या कार्यवाहीची माहिती व तद्अनुषंगाने अपात्र कार्डधारकां बाबतची माहिती | या अपिलातील व अपील क्र.६७ व १५८ (सातारा) मधील विषयात सार्धम्य आहे. सदर अपिलाबाबतचे दि. २१.७.२००८ रोजीचे आदेश विचारात घेऊन अपीलकर्त्यास मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. शिधापत्रिकाबाबतची सखोल चौकशी करून अपात्र व्यक्तिंना दिलेल्या लाभाबाबतची तसेच दारिद्र्य रेषेखालील यादीतील समावेशासाठी दिलेल्या प्रमाणपत्रां बाबतची जबाबदारी निश्चित करून त्या अनुषंगाने संबंधितांवर केलेल्या कारवाईची माहिती तहसीलदार पाटण, जि.सातारा यांनी अपीलकर्त्यास व आयोगाला सादर करावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** २०.**१०.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. समीर खुदबुद्दीन सय्यद, कच्छी चाळ, ओगलेवाडी, ता. कराड, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३३६ / सातारा | अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा जि. सातारा | अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा जि. सातारा | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६ चे कलम २४७ अन्वये आरटीएस अपिले जानेवारी २००५ ते ऑक्टोबर २००७ या कालावधीत किती दाखल झालेली आहेत, याबाबत व इतर एकूण पाच मुद्दयांबाबत माहिती | अपीलकर्ता सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत पत्राने कळविले आहे. माहिती तयार असून घेऊन जाण्याबाबत कळविले असता माहिती नेली नाही, तसेच नंतर माहिती व्ही.पी. ने पाठविली असता ती स्वीकारली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्याने आवश्यक असल्यास नियमानुसार पूर्तता करून माहिती प्राप्त करून घ्यावी.

**पुणे**
**दि.** १८.१०.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भालचंद्र रत्नाकर रायरीकर
मु.पो.विंझर, ता.वेल्हे, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४०+१२८५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भालचंद्र रत्नाकर रायरीकर
मु.पो.विंझर, ता.वेल्हे, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे श्री.डी.पी.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे श्रीमती शीतल भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | मौजे विंझर, ता.वेल्हे येथील गट नं.६५७,६५८,६५९ व ६८४ मधील कुळांची नांवे तलाठ्यांनी कोणाच्या आदेशाने कमी केली, आदेशाची प्रत. वरील गटक्रमांकाचे १९८०-८१ ते १९९५-९६ या मुदतीतील ७/१२ उतारे तलाठी दप्तरातून नष्ट झाले, त्यांचे पुनर्लेखनाच्या आदेशाची प्रत. याबाबतचा मंडल निरीक्षक यांचा अहवाल प्रत. |

## विवेचन

मौजे विंझर, ता.वेल्हे, जि.पुणे येथील जमिनीच्या मालकी हक्कातील कुळांच्या नोंदी कमी केल्याबाबतची व त्या अनुषंगाने केलेल्या तक्रारीवरील चौकशीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.भालचंद्र रत्नाकर रायरीकर यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, वेल्हे यांच्याकडे मागितली होती. ती पूर्ण न मिळाल्यामुळे व तलाठी दप्तरातून काही भाग नष्ट झाल्याचे सांगण्यात आल्यामुळे श्री.रायरीकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.रायरीकर हे ज्येष्ठ नागरिक असून (वय ७७) अनेक अर्जांद्वारे ही माहिती मागत आहेत. चौकशी चालू असल्याचे उत्तर त्यांना एप्रिल २००६ पासून तहसीलदार, वेल्हे यांच्याकडून देण्यात येत आहे. या चौकशीला एवढा विलंब लागण्याचे कारण काय, अशी विचारणाही त्यांनी काही पत्रांमध्ये केली आहे. तसेच नावे कमी करण्याबाबतच्या तक्रारीवरील मंडल निरीक्षक यांचे आदेश, तलाठी यांचा अहवाल आदिंच्या प्रतीही ते मागत आले आहेत.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. परंतु त्यावेळी संबंधित अधिकारी हजर राहू न शकल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्याने सन १९८० पासूनचे ७/१२ चे उतारे मागितले आहेत. त्यातील चार उतारे मिळाले व बाकीचे उपलब्ध नाहीत असे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यांनी दिले. संबंधित उतारे तलाठी दप्तरात उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी गावकामगार तलाठ्याच्या लेखी पत्रासह नमूद केले. ७/१२ उताऱ्यावरील नोंदीमध्ये बदल केला गेला, परंतु त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येते व चौकशी चालू असल्याचे उत्तर देण्यात येते.

श्री.रायरीकर यांनी तलाठ्याच्या दप्तरातून ७/१२ उतारे नष्ट झाल्याबाबत खातेनिहाय चौकशीसाठी प्रस्ताव पाठविला असल्यास त्यांचा प्रस्ताव, दिनांक व क्रमांक द्यावा, प्रस्ताव पाठविला नसल्यास त्याच्या कारणांची माहिती द्यावी, पोलिसांकडे प्राथमिक चौकशी अहवाल नोंदविण्याबाबतची माहिती द्यावी, अशी मागणीही काही अर्जाद्वारे केली आहे. कागदपत्रे कोणाकडून व कशी गहाळ झाली, तसेच दप्तर दिरंगाई कायद्यात नमूद केलेल्या मुदतीत प्रकरणाची तड का लागत नाही, असा प्रश्न श्री.रायरीकर यांनी उपस्थित केला. उपस्थित अधिकारी त्याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. संबंधित कागदपत्रांचा एक महिन्यात शोध घ्यावा, या कागदपत्रांच्या जतनाला जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून त्याबाबतचा अहवाल घ्यावा व कागदपत्रे गहाळ झाली असल्यास, तसेच अन्य कोणत्याही प्रकारे माहितीची पूर्तता करता येत नसल्यास जबाबदार कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र अभिलेख अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कारवाई करावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानंतर अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यापैकी कोणाकडूनही पुढील पूर्ततेबाबत आयोगास अवगत करण्यात आलेले नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) कागदपत्रे गहाळ होण्याबाबतच्या संदर्भात आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, वेल्हे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वेल्हे यांनी संयुक्तपणे, हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.१०.२००८
ऑक्टोबर-५-७